*** महत्वाची टीप ***

- महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियामाचे **कलम ६१** मधील तरतुदीनुसार आवश्यक ते कर्मचारी नेमणूक करण्याचे पूर्ण अधिकार पंचायातीस आहेत.
- ग्रामपंचायत कर्मचारी नेमणूक करण्याबाबत भरती प्रक्रिया कशी राबवावी याबाबत कोणतेही नियम केलेले नाहीत.
- मुंबई ग्रामपंचायत नोकरांबाबत (सेवेच्या शर्ती) नियम, १९६० मधील अटी व शर्ती यास अधीन राहून कर्मचारी भरती प्रक्रिया अथवा नेमणूक करण्याची कार्यपद्धती त्या त्या ग्रामपंचायतीस ठरावाद्वारे निश्चित करता येईल. व त्यानुसार कर्मचारी नेमणूक करता येईल.

- सर्वांच्या सोईकरिता सध्या अस्तित्वात असलेले नियम / शासन निर्णय याच्या आधारे पंचायातीस शक्य असलेली ग्रा. पं. कर्मचारी भरती प्रक्रिया पुढे देण्यात येत आहे.
- ही भरती प्रक्रिया अंतिम नाही. पंचायातीस त्यांच्या सोईनुसार कर्मचारी भरती प्रक्रिया ठरावाद्वारे ठरविता येईल.

ग्राम पंचायत कर्मचारी भरती प्रक्रिया

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशिल	पान क्र.
१	ग्राम पंचायत पदभरती विषयी प्राथमिक माहिती	०२ - ०३
२	पदभरती प्रक्रिया पुर्वपरवानगी मासिक सभा ठराव	०४ - ०५
३	ग्राम पंचायत पदभरती जाहिरात	०६ - ०८
४	पदभरती जाहिरात जाहिर प्रगटन पंचनामा	०९
५	पदभरती अर्जाचा नमुना	१० - १२
६	अर्ज छाननी / कागदपत्र पडताळणी सुचना पत्र	१३
७	अर्ज छाननी / कागदपत्र पडताळणी नमुना	१४
८	पात्र / अपात्र अर्ज व उमेदवारांना मिळालेल्या गुणांची गुणतालिका	१५
९	कर्मचारी निवडीचा ठराव	१६ — १७
१०	कर्मचारी नेमणूक आदेश	१८
११	वैद्यकिय तपासणीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांना पत्र	१९
१२	चारित्र्य पडताळणीसाठी जिल्हा पोलिस अधिक्षक यांना पत्र	२०
१३	कर्मचारी नियुक्ती बद्दल मा. गट विकास अधिकारी यांना पत्र	२१
१४	कर्मचाऱ्याचे भ.नि.नि.चे खाते काढण्यासाठी मासिक सभा ठराव	२२
१५	कर्मचाऱ्याचे भ.नि.नि.चे खाते काढण्यासाठी मा.ग.वि.अ. यांना पत्र	२३

ग्रामपंचायत कर्मचारी भरती प्रक्रिया

वाचा :- १) महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम - कलम ६१
२) मुंबई ग्रामपंचायत नोकरांबाबत (सेवेच्या शर्ती) नियम, १९६०
३) शासन परिपत्रक क्र. व्हिपीएम २६८९/२२९७/२१, मंत्रालय, मुंबई दि. २९ डिसेंबर १९८९
४) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीएम २६९९/प्र.क्र.२०६(१)/२१, दि. २१ जानेवारी २०००
५) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. ग्रापक २००५/प्र.क्र. १४/पंरा-५ दि. २२ मार्च २००५
६) ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. व्हीपीएम-२००८/प्र.क्र. ११/पंरा-३, ०५ ऑगष्ट २००८
७) ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम-२०१३/प्र.क्र. ६०/पंरा-३ दि. ०८ जुलै २०१३
८) ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. व्हीपीएम-२०१३/प्र.क्र. २४३/पंरा-३, दि. ३० ऑक्टोबर २०१३
९) शासन निर्णय क्र. प्रानिमं १२१५/(प्र.क्र.१०९/१५)/१३-अ दि. ५ आक्टोबर, २०१५
१०) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीएम-२०१८/प्र.क्र. ३९७/पं.रा.-३ दि. १७ सप्टेंबर २०१८

---

१) स्थायी कर्मचारी पदभरती :-
शासनाने ग्राम पंचायतीस ठरवून दिलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणत **आकृती बंधानुसार** रिक्त पदाची खात्री करून पदभरती करावी.

त्याशिवाय अधिक कर्मचारी आवश्यकता असल्यास शक्यतो कंत्राटी पद्धतीने किंवा तात्पुरत्या स्वरुपात कर्मचारी नेमणुकीने कामे करुन घ्यावीत. अधिकचे कायम कर्मचारी नेमणूक करावयाची असल्यास ते करण्यापूर्वी कामाची निकड व पंचायतीचे स्वउत्पन्न याचा ताळमेळ विचारात घ्यावा.

२) अस्थायी कर्मचारी पदभरती :- यात सरपंच ग्राम पंचायतीच्या गरजेनुसार व कामाच्या व्यापानुसार कर्मचारी नियुक्त करू शकतात.

१. स्थायी / अस्थायी पदभरतीसाठी सर्वप्रथम ग्राम पंचायत मासिक सभेची ठरावाद्वारे पदभरतीसाठी पुर्व परवानगी घ्यावी. (ग्राम पंचायतीच्या परवानगी शिवाय सरपंच केवळ हंगामी स्वरुपात अस्थायी कर्मचारी नेमु शकतात.)

२. मासिक सभेच्या परवानगी नंतर पद भरतीची जाहिरात द्यावी. सदर जाहिरातीत पदाचे नाव, आवश्यक शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा व ईतर पात्रता, कामाचे स्वरूप, वेतनाची माहिती यासह ईतर आवश्यक ती माहिती देऊन अर्ज मागवून घ्यावेत.

३. एकच अर्ज आला असेल आणि अर्जदार हा सदरील पदासाठी आवश्यक ती पात्रता धारण करीत असेल तर त्याला मासिक सभेच्या ठरावाद्वारे निवड करून नेमणूक आदेश देता येईल. किंवा अपात्र असेल तर नव्याने जाहिरात द्यावी.

४. एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले असतील तर प्राप्त अर्जाची छाननी करून पात्र / अपात्र अर्जाची माहिती प्रसिध्द करावी. अपात्र अर्जाची माहिती अर्ज अपात्र होण्याचे कारणांसह प्रसिध्द करावी.

५. यानंतर सर्व पात्र उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार गुण देण्यात यावेत. (किमान शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यास ० गुण आणि त्यापुढील उत्तीर्ण झालेल्या प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी १ गुण याप्रमाणे गुण द्यावेत) अधिकतम गुण मर्यादा ६ असावी.

६. सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या प्रथम ३ उमेदवारांना सूचना देऊन मुळ कागदपत्र पडताळणीसाठी व मुलाखतीसाठी बोलवावे.

७. एखादा उमेदवार ग्रामपंचायतच्या मयत कर्मचाऱ्याचा वारस असल्यास अनुकंपा तत्वावर त्यास प्राधान्य द्यावे.

८. गुणानुक्रमे प्रथम ३ उमेदवारांमधुन मासिक सभेत मान्यता देऊन अंतिम निवड करण्यात यावी.

९. त्यानंतर संबंधितास नेमणूक आदेश देण्यात यावे.

१०. आदेशात सर्व अटी व शर्तीचा उल्लेख करावा.

११. यानंतर संबंधित कर्मचारी रूजू झाल्यानंतर त्यास वैद्यकीय तपासणीकरिता जिल्हा शासकीय रुग्णालय येथे पाठवण्यात यावे. वैद्यकीय प्रमाणपत्र (फिटनेस) आणि पोलीस अधीक्षक यांचे चारित्र्य प्रमाणपत्र घ्यावे.

१२. तसेच त्या कर्मचाऱ्याचा उपस्थिती अहवाल पंचायत समितीस मा. गट विकास अधिकारी यांना पाठवावा. यात संबंधिताचा मासिक सभा नियुक्तीचा ठराव, नेमणूक आदेश यांची प्रत सोबत जोडावी.

१३. यानंतर संबंधिताचे भविष्य निर्वाह निधी खाते उघडण्याची कार्यवाही करावी.

१४. यासाठी कर्मचारी व ग्राम पंचायत सचिव यांचे संयुक्तरित्या भ.नि.नि. खाते उघडण्याविषयी एक मासिक सभेचा ठराव घेऊन, त्या ठरावासोबत कवरिंग लेटर जोडून मा. गट विकास अधिकारी यांच्या कार्यालयात खाते उघडण्यासाठी बँकेच्या मॅनेजरच्या नावे परवानगी पत्र मिळण्यासाठी अर्ज करावा.

१५. यानंतर मग मा. गट विकास अधिकारी साहेब यांचे परवानगी पत्र आणि मासिक सभेच्या ठरावासोबत कर्मचारी आणि ग्राम पंचायत सचिव यांचे शासकिय ओळखपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड, तीन पासपोर्ट फोटो, कर्मचाऱ्याच्या सेवा पटाची पहिल्या पानाची सत्यप्रत यासह आवश्यक ती सर्व कागदपत्रे जमा करून भ.नि.नि.चे खाते काढावे.

१६. भ.नि.नि.चे खाते उघडल्यानंतर जर कर्मचारी आकृती बंधानुसार स्थायी स्वरुपाचा असेल तर ग्राम पंचायत सचिवाच्या ERP लॉगिन मधुन नवनियुक्त कर्मचाऱ्याची माहिती भरून ती मा. गट विकास अधिकारी यांचे लॉगिन मध्ये मान्यतेसाठी पाठवावी. मा. गट विकास अधिकारी यांचे कडून ऑनलाईन मान्यता मिळाल्यानंतर सदरील कर्मचाऱ्याची दरमहा ऑनलाईन उपस्थिती नोंदवून वेतन मान्यता द्यावी. जेणेकरून कर्मचाऱ्याला शासनाकडून मिळणारे किमान वेतन मिळेल.

१७. परंतु जर सदरील कर्मचारी आकृती बंधाच्या बाहेरील असेल तर त्याची माहिती ऑनलाईन भरता येणार नाही, त्या कर्मचाऱ्याला शासनाकडून मिळणारे किमान वेतन मिळणार नाही. तर त्याला ग्राम पंचायत मार्फत ठरवलेले वेतन **ग्रामनिधीतून** देण्यात यावे.

परिशिष्ट – ब (सभेचे इतिवृत्त नोंदवहीचा नमुना)

दिनांक – / /२०__ रोजी झालेल्या मासिकसभा बैठकीचे इतिवृत्त

१)ग्रामपंचायतीचे नाव :-		२) सभेची वेळ :- सकाळी
३)सभेचा क्रमांक:-	४) सभेची तारीख :- / /२०	५)सभेचे स्थळ :- ग्रामपंचायत कार्यालय,

६)सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजार असल्यास त्याची नोंद (हुद्द्यासह)
७)सभेचे अध्यक्ष मान्यवर:- श्री/ श्रीमती -- सरपंच / उपसरपंच यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेमधील उपस्थिती खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	सभेस उपस्थित कर्मचायाचे नाव	हुद्दा	भ्रमणध्वनी क्रमांक	ई-मेल आयडी	स्वाक्षरी
१					
२					

अ. क्र.	सभेस उपस्थित पंचायत सदस्याचे नाव	असल्यास भ्रमनध्वनी व ई-मेल आयडी	स्वाक्षरी
१			
२			
३			
४			
५			
६			
७			
८			
९			
१०			
११			

अ) वरीलप्रमाणे सभेस --- (सदस्य) उपस्थित असल्याने व कोरम पूर्ण झाल्याने सभेचे अध्यक्ष ---------------------- ----------------------------------- यांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेस सुरुवात करण्यात आली.

विषय क्रमांक	ठराव क्रमांक	सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय व ठराव	शेरे आणि दिनांकासह ठरावाची अंमलबजावणी
०	०	**विषय :- ग्राम पंचायत सेवक /पाणीपुरवठा सेवक/लिपीक निवड करणे.** सूचकांनी असा ठराव मांडला की, आपल्या ग्राम पंचायतच्या आकृत्ती बंधाप्रमाणे ग्राम पंचायत सेवकाचे एक पद मंजूर आहे. ग्रा.पं. चे यापुर्वीचे कर्मचारी श्री --- हे निवृत्त झाल्यामुळे/ मृत्यु पावल्यामुळे/ राजीनामा दिल्यामुळे/ काढुन टाकल्यामुळे ते पद रिक्त झाले आहे. त्या रिक्त जागेवर नविन सेवक/ पाणीपुरवठा सेवक/लिपीक निवड करण्यात यावी. त्याकरिता सेवक/ पाणीपुरवठा सेवक/लिपीक पदासाठी मुंबई ग्रामपंचायत नोकरांबाबत (सेवेच्या शर्ती) नियम, १९६० मधील तरतुदीनुसार पात्र उमेदवारांकडून	

		अर्ज मागविण्यात यावेत. आणि त्यांची शैक्षणिक पात्रतेनुसार गुणानुक्रमे यादी तयार करुन प्रथम ३ उमेदवारांची नावे त्यानंतरच्या सभेत पटलावर ठेवण्यात यावीत. त्यावर ग्रामपंचायत सभा निर्णय घेऊन अंतिम उमेदवाराची निवड करील. सेवक निवडीबाबतचे सर्व अधिकार पंचायतीकडे असतील. सदरील ठरावावर सविस्तर चर्चा करून, सदरील ठराव हा सर्वानुमते मंजूर करण्यात आला. सूचक : -- अनूमोदक : -- हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.	

ग्राम पंचायत कार्यालय ___________ ता. ___________ जि. __________

ग्राम पंचायत कर्मचारी पद भरती जाहिरात दिनांक :- __/__/२०__

संदर्भ :-

१. महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ६१
२. मुंबई ग्रामपंचायत नोकरांबाबत (सेवेच्या शर्ती) नियम, १९६०
३. शासन परिपत्रक क्र. व्हिपीएम २६८९/२२९७/२१, मंत्रालय, मुंबई दि. २९ डिसेंबर १९८९
४. ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीएम २६९९/प्र.क्र.२०६(१)/२१, दि. २१ जानेवारी २०००
५. ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. ग्रापक २००५/प्र.क्र. १४/पंरा-५ दि. २२ मार्च २००५
६. ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. व्हीपीएम-२००८/प्र.क्र. ११/पंरा-३, ०५ ऑगष्ट २००८
७. ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम-१०१३/प्र.क्र. ६०/पंरा-३ दि. ०८ जुलै २०१३
८. ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. व्हीपीएम-२०१३/प्र.क्र. २४३/पंरा-३, दि. ३० ऑक्टोबर २०१३
९. शासन निर्णय क्र. प्रानिमं १२१५/(प्र.क्र.१०९/१५)/१३-अ दि. ५ आक्टोबर, २०१५
१०. ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीएम-२०१८/प्र.क्र. ३९७/पं.रा.-३ दि. १७ सप्टेंबर २०१८
११. ग्राम पंचायत कार्यालय, ---------------------- ची सभा दिनांक / /२० ___ ठराव क्र. _______

सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, ग्राम पंचायत --------------------- साठी एक सेवक/पाणीपुरवठा सेवक/ लिपीक पद मंजूर असून, हे पद रिक्त आहे. तेव्हा दि. / /२० रोजी झालेल्या सभेतील मान्यतेनुसार महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम मधील कलम ६१ प्रमाणे प्राप्त अधिकारात सदरील पदाच्या निवडीसाठी ईच्छूकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. खालील अटी व शर्तीच्या निकषात बसणाऱ्या ईच्छूकांनी आपले अर्ज विहित कालावधीत ग्राम पंचायत कार्यालयात सादर करावेत.

- **अर्ज करण्याची पध्दत :-**

१	प्रस्तुत पदा करीता फक्त लेखी स्वरूपात (ऑफलाईन पध्दतीने)अर्ज स्विकारण्यात येतील.
२	पात्र उमेदवारांनी आपले विहित नमुन्यातील अर्ज हे दिनांक / / २० रोजी सकाळी १०:०० वाजेपासून ते दिनांक / / २० रोजी सांयकाळी ०५:०० वाजेपर्यंत आवश्यक त्या कागदपत्रासह ग्राम पंचायत कार्यालयात जमा करावेत.
३	वरील विहित कालावधीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

या कर्मचारी भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात ग्राम पंचायत कार्यालय ______________________ येथिल सूचना फलकावर चिकटवलेली असून उमेदवारांनी जाहिरातीत नमूद संपुर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून अर्ज सादर करावेत. तसेच भरती प्रक्रिया संबंधित प्रक्रियेसाठी आवश्यक व अद्यावत माहितीसाठी नियमितपणे सूचना फलक पाहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

भरती प्रक्रिया स्थगित करणे किंवा रद्द करणे, तसेच भरती प्रक्रिया संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकरण तथा ग्राम पंचायत कार्यालय __________________ ता. _________________ यांना असतील.

ग्राम पंचायत कार्यालय __________________ ता. ________________ अंतर्गत कर्मचारी भरती - २० अन्वये भरावयाच्या पदांचे नाव, रिक्त पद संख्या सामाजिक आरक्षण इत्यादींचा एकत्रित तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	पदाचे नाव	भरावयाच्या पदांची संख्या	प्रवर्ग
१	शिपाई (वर्ग-४) – अकुशल	०१	पद आरक्षित नाही.
२	पाणीपुरवठा सेवक (वर्ग-४) - अर्ध कुशल	--	पद आरक्षित नाही.
3	लिपीक (वर्ग-३) – कुशल	--	पद आरक्षित नाही.

- **पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता**

अ.क्र.	पदाचे नाव	किमान शैक्षणिक अर्हता व अनुभव	शेरा
१	शिपाई (वर्ग-४)	प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा मातृभोषेतील व्हर्नाक्युलर ७ वी, परिक्षा पास असलेले प्रमाणपत्र किंवा मान्यता प्राप्त प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेच्या प्राधिकाऱ्याने ७ वी ची परिक्षा झाल्याबद्दलचे शालांत परिक्षा प्रमाणपत्र.	
२	पाणीपुरवठा सेवक (वर्ग-४)	प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा मातृभोषेतील व्हर्नाक्युलर ७ वी, परिक्षा पास असलेले प्रमाणपत्र किंवा मान्यता प्राप्त प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेच्या प्राधिकाऱ्याने ७ वी ची परिक्षा झाल्याबद्दलचे शालांत परिक्षा प्रमाणपत्र.	पाणीपुरवठा योजना चालविणे बाबत तांत्रिक माहिती/ अनुभव आवश्यक

3	लिपीक (वर्ग-३)	उच्च माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र (एच. एस. सि.) परीक्षा उत्तीर्ण किंवा समकक्ष (१० + २) पदविका प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण	

- **वयोमर्यादा** :-

अ) अर्ज सादर करण्याचे अंतिम दिनांकास कोणत्याही उमेदवारांचे वय १८ वर्ष पेक्षा कमी नसावे.

ब) सामाजिक व समांतर आरक्षणानुसार विहित वरची वयोमर्यादेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	आरक्षण / समांतर आरक्षण	कमाल वयोमर्यादा
१.	खुल्या प्रवर्गातील उमेदवार	२८ वर्ष
२.	विशेष तांत्रिक प्राविण्य प्राप्त खुल्या प्रवर्गातील उमेदवार (मा. गटविकास अधिकारी यांच्या मान्यतेने)	३० वर्ष
३.	मागासवर्गीय उमेदवार	३३ वर्ष
४.	विशेष तांत्रिक प्राविण्य प्राप्त मागासवर्गीय उमेदवार (मा. गटविकास अधिकारी यांच्या मान्यतेने)	३५ वर्ष

- **वरील सर्व पदांसाठी आवश्यक सामाईक अर्हता खालील प्रमाणे असेल.**

अ) लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र	महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ मधील तरतूदीनुसार विहित नमून्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, अपत्यामुळे उमेदवार ग्रामपंचायत सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल.
आ) उमेदवार स्थानिक ग्राम पंचायत क्षेत्रातील रहिवाशी असावा.	उमेदवार हा स्थानिक ग्राम पंचायत क्षेत्रातील रहिवाशी असावा. निवासाचा पुरावा आवश्यक (जर ग्राम पंचायत क्षेत्रातील अर्ज प्राप्त झाले नाही तर पंचक्रोशीतून आलेल्या उमेदवाराचा अर्ज विचारात घेतला जाईल.)

- **अर्ज भरण्याची कार्यपध्दती व सूचना :-**

१	उमेदवाराने विहित नमुन्यात व स्वत:च्या हस्ताक्षरात सुवाच्यपणे अर्ज भरावा. अर्जासोबत नजिकच्या काळातील रंगीत पासपोर्ट आकाराचा फोटो चिटकवावा.
२	अर्जात उमेदवाराचे नाव, वडीलांचे नाव / पतींचे नाव, आडनाव, आईचे नाव, जन्मदिनांक, धर्म, जात, पोटजात, भ्रमरध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मूलभूत माहिती आहे. जी उमेदवारानी सविस्तर द्यावी.
३	उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार नमूद करावा. उदा. कायमस्वरूपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ. माहिती अचूक भरावी.
४	मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र व जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सत्यप्रत सोबत जोडावी.
५	शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी.
६	उमेदवाराने अर्जासोबत अनूभव दाखला असल्यास पूरावा सोबत जोडावा.
७	उमेदवाराने अर्जासोबत कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात.

- **विशेष सूचना :-**

१	**कामाचे स्वरूप** :- कर वसूली, शुध्द पाणी पुरवठा, ग्राम स्वच्छतेची सर्व कामे, दिवाबत्ती व्यवस्था, दंवडी देणे इ. व वेळोवळी ग्राम पंचायत आदेशीत करील ते ईतर सर्व कामे करणे बंधनकारक राहील.
२	**वेतन** :- शासन निर्णयानुसार किमान वेतनाप्रमाणे ग्रामपंचायत ठरवील त्यानुसार वेतन व राहणीमान भत्ता देय राहील.
३	**चारित्र्य**-पुर्वचारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहणार नाही. कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील.
४	निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकिय तपासणी करण्यात येईल. वैद्यकिय अहवाल प्रतिकूल असल्यास केलेली निवड व नेमणूक रद्द करण्यात येईल.
५	निवड झालेल्या उमेदवाराने आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र मूळ प्रतीची पुर्तता करून देणे आवश्यक राहील.

- पात्र उमेदवार यांना शैक्षणिक पात्रतेनुसार गुण देण्यात येतील व गुणानुक्रमे प्रथम ३ उमेदवार यांचा नेमणुकीसाठी विचार केला जाईल व त्यांच्यापैकी एकाची निवड करण्याचा अंतिम निर्णय ग्रामपंचायत घेईल.

- **सर्वसाधारण सूचना :-**

उमेदवारांनी अर्ज सादर करीत असताना अर्जासोबत फक्त कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती सोबत जोडाव्यात. अर्जासोबत कोणतेही मूळ कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. कागदपत्र पडताळणीच्या प्रक्रियेवेळी पदांकरिता आवश्यक मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत कार्यालय ____________________
ता.________________ जि. __________

- **प्रत प्रसिद्धीस्तव-**

१. ग्राम पंचायत नोटीस बोर्ड
२. ग्राम पंचायत कार्यक्षेत्रातील सार्वजनिक ठिकाणी
३. -------------------- स्थानिक वृत्तपत्र

ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत कार्यालय ____________________
ता.________________ जि. __________

- **अर्जासोबत जोडावयाचे कागदपत्रांची सूची**

१. विहित नमुन्यातील अर्ज
२. स्थानिक रहिवाशी असल्याबाबतचे प्रमाणपत्र
३. शाळा सोडल्याचा दाखला
४. प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा मातृभोषेतील व्हर्नाक्युलर ७ वी, परिक्षा पास असलेले प्रमाणपत्र किंवा मान्यता प्राप्त प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेच्या प्राधिकाऱ्याने ७ वी ची परिक्षा झाल्याबद्दलचे शालांत परिक्षा प्रमाणपत्र / गुणपत्रक मुळ प्रत
५. ईतर शैक्षणिक प्रमाणपत्र
६. छायाचित्र ओळख पुरावा (आधार कार्ड, पॅनकार्ड, वाहन परवाना, निवडणूक ओळखपत्र इ.)
७. उमेदवाराचे नजिकच्या कालावधीतील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (दोन प्रती)

ग्राम पंचायत सेवक निवड बाबत जाहिर नोटीस गावात सार्वजनिक ठिकाणी प्रसिध्द केलेबाबतचा पंचनामा

दि.____/___/ २०___

अ.क्र.	वाडी वस्तीचे नाव	सार्व. ठिकाणचे नाव	पंचाचे नाव	स्वाक्षरी
१.	__________________ ता. _______________		१. २. ३. ४. ५.	
२.	__________________ ता. _______________		१. २. ३. ४. ५.	
३.	__________________ ता. _______________		१. २. ३. ४. ५.	
४.	__________________ ता. _______________		१. २. ३. ४. ५.	

ग्रामसेवक   सरपंच

ग्रामपंचायत कार्यालय ______________

ता.______________ जि. ____________

ग्राम पंचायत कार्यालय ____________ ता. ___________ जि. ___________

ग्राम पंचायत कर्मचारी पद भरती अर्जाचा नमुना

ज्या पदासाठी अर्ज करावयाचा त्या पदाचे नाव - सेवक / पाणीपुरवठा सेवक/ लिपीक

उमेदवाराचे पुर्ण नाव :-	आडनाव नाव वडिलांचे/पतीचे नाव			उमेदवाराने येथे नजिकच्या काळातील **रंगीत पासपोर्ट फोटो** चिटकवावा व खालील चौकौनात आपली स्वाक्षरी करावी
आईचे नाव :-				
लिंग :-	☐ पुरुष ☐ स्त्री ☐ ईतर			
धर्म :-				
जात (पोटजात) :-				
जातीचा प्रवर्ग :				
आधार कार्ड क्रमांक :-				
संपर्क क्रमांक :-				
ईमेल आयडी (असल्यास)				
जन्मदिनांक :-		**दिनांक :- महिना :- वर्ष :-**		
दिनांक :- / / २० रोजीचे वय :-		**वर्ष :- महिने :- दिवस :-**		
वैवाहिक स्थिती :-		**विवाहित / अविवाहित**		
उंची :-	( ) **सेमी.**	**वजन :-**	( ) **कि.ग्रॅ.**	
उमेदवार नॉनक्रिमीलेअर मध्ये मोडतो काय ? असल्यास प्रमाणपत्र जोडावे				
अर्जदारास मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येते का ?				
अर्जदार हा अन्यत्र नोकरी वा व्यवसाय करतो का ? (असल्यास तपशील द्यावा)				
लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे का ?				
संपर्काचा पत्ता :-	**राहणार :-** **तालुका :-** **राज्य :-**	**पोस्ट :-** **जिल्हा :-** **पिन कोड :-**		
कायमचा पत्ता :-	**राहणार :-** **तालुका :-** **राज्य :-**	**पोस्ट :-** **जिल्हा :-** **पिन कोड :-**		

शैक्षणिक अर्हता :-

अ.क्र.	शैक्षणिक पात्रता	शाळेचे/बोर्डाचे/विद्यापीठाचे नाव	उतीर्ण वर्ष	एकूण गुण	मिळालेले गुण	टक्केवारी
१	७ वी					
२	१० वी					
३	१२ वी					
४	पदवी/पदविका					
५	MS-CIT					
६	ईतर					
७						

अर्जदार दिव्यांग आहे का ?	**होय / नाही**	
असल्यास प्रकार :-		**टक्केवारी :-**

अनुभव (असल्यास) :-

अ.क्र.	**संस्था / कार्यालयाचे नाव**	**पद**	**कालावधी**
१			
२			

आपणाविरूध्द न्यायालयात यापूर्वी कोणत्याही प्रकरणी खटला दाखल करण्यात आला होता का ?	होय / नाही
शासकिय/निमशासकिय संस्था यांच्याकडून शिस्तभंगविषयक अथवा तत्सम कारवाई सुरु आहे का ?	होय / नाही

ठिकाण :-
दिनांक :- / / २०

अर्जदाराची स्वाक्षरी ---------------------------
(अर्जदाराचे पुर्ण नाव) --

प्रतिज्ञापत्र

मी …………………………………………………………………………… असे प्रमाणित करतो/करते की, प्रस्तुत पदाची जाहिरात/अधिसूचना वाचली असून त्यातील पदविषयक माहिती मी काळजीपूर्वक वाचली आहे व ती मला मान्य आहे. सदर पद मिळण्यासाठी जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीची मी पूर्तता करतो / करते. याची मी खात्री केली आहे. या अर्जात दिलेली माहिती माझ्या माहिती प्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्याच माहितीच्या आधारे माझी झालेली नियुक्ती रद्द होईल आणि मिळालेली नोकरी गमावण्यास मी बाध्य राहील व पुढील योग्य त्या कारवाईस पात्र राहील. याची मला जाणीव आहे.

मी निम्नस्वाक्षरीत, याद्वारे माझी ओळख पडताळणीकरीता माझ्या आधार माहितीचा वापर करण्यास ग्राम पंचायत कार्यालयाला संमती देत आहे.

ठिकाण :-
दिनांक :- / / २०

अर्जदाराची स्वाक्षरी ---------------------------
(अर्जदाराचे पुर्ण नाव) --

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार

अर्जासोबत जोडावयाचा लहान कुटूंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना

प्रतिज्ञापत्र

नमूना-अ

(नियम ४ पहा)

मी श्री/श्रीमती/कुमारी ....
श्री. .... यांचा/ यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय .... वर्षे, राहणार ....ता. .... जि. .... याद्वारे असे जाहीर करतो / करते की,

१. मी .... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
२. आज रोजी मला .... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .... आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)
३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मूलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :- --------------------

दिनांक :- / / २०

अर्जदाराची स्वाक्षरी --------------------------

(अर्जदाराचे पुर्ण नाव) ------------------------------------

ग्राम पंचायत कार्यालय ___________ ता. __________ जि. __________

सूचना पत्र **दि. __/__/२०__**

प्रति,

श्री. _______________________________

रा._____________ ता.___________

विषय :- कागदपत्र तपासणीस उपस्थित राहणे बाबत.

संदर्भ :- १. ग्राम पंचायत कर्मचारी पद भरती जाहिरात दि.___/___/२०____

२. ग्राम पंचायत कर्मचारी पद भरती संदर्भांत आपला अर्ज दि.____/___/२०___

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, ग्रामपंचायत कार्यालय ____________ ता.________जि. __________ मार्फत ग्राम पंचायत सेवक / पाणीपुरवठा सेवक / लिपीक पद भारती करीता आपला अर्ज प्राप्त आहे.

सदरील अर्जातील नमुद अर्हता बाबत कागदपत्रांची पडताळणी दि.___/____/२०____ रोजी सकाळी ठिक : __:__ वाजता ग्रामपंचायत कार्यालय ________________ ता.___________येथे ठेवण्यात आली आहे.

या दिवशी विहित वेळी आपल्याकडील अर्ज करतेवेळी अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या सर्व मुळ प्रतीसह उपस्थित राहावे. आपल्या सर्व मुळ कागदपत्राची पडताळणी करून आपली सर्व कागदपत्रे बरोबर व पदाच्या अर्हतेनुसार यथा योग्य असल्याबाबत खात्री करुन आपला अर्ज पात्र किंवा अपात्र ठरवण्यात येणार आहे.

- **कागदपत्रांची सूची**

८. अर्ज सादर केल्याची पोहोच पावती
९. स्थानिक रहिवाशी असल्याबाबतचे प्रमाणपत्र
१०. शाळा सोडल्याचा दाखला
११. प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा मातृभोषेतील व्हर्नाक्युलर ७ वी, परिक्षा पास असलेले प्रमाणपत्र किंवा मान्यता प्राप्त प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेच्या प्राधिकाऱ्याने ७ वी ची परिक्षा झाल्याबद्दलचे शालांत परिक्षा प्रमाणपत्र / गुणपत्रक मुळ प्रत
१२. अर्जासोबत जोडलेले ईतर शैक्षणिक प्रमाणपत्र
१३. छायाचित्र ओळख पुरावा (आधार कार्ड, पॅनकार्ड, वाहन परवाना, निवडणूक ओळखपत्र इ.)
१४. उमेदवाराचे नजिकच्या कालावधीतील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (दोन प्रती)
१५. या व्यतिरीक्त गरजेनुसार कागदपत्रांची आवश्यकता पडल्यास विहित मुदतीत सदरची कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत.

वरील मुळ कागदपत्रासह दिलेल्या वेळेत उपस्थित राहावे, विहित वेळी सक्षम कारणांसह अनूपस्थित राहिल्यास आपली निवड रद्द करण्यात येईल, तसेच सक्षम कारणामुळे अनूपस्थित राहायचे असल्यास त्या बाबत ग्रा.पं. कार्यालयाला व्यक्तीश: कळविण्याची जबाबदारी आपली राहील. याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

ग्रामसेवक सरपंच
ग्राम पंचायत कार्यालय ____________
ता._________ जि. _________

ग्राम पंचायत कार्यालय ___________ ता. __________ जि. __________

ग्राम पंचायत कर्मचारी भरती २०___

कागदपत्र पडताळणी

दि.___/___/२०____

अ.क्र.	कागदपत्रांची सूची	मुळ कागदपत्र व अर्जासोबत जोडलेली सत्यप्रत योग्य / अयोग्य	शेरा
१.	अर्ज सादर केल्याची पोहोच पावती	योग्य / अयोग्य	
२.	स्थानिक रहिवाशी असल्याबाबतचे प्रमाणपत्राची मुळ प्रत	योग्य / अयोग्य	
३.	शाळा सोडल्याचा दाखला (मुळ प्रत / सत्यप्रत)	योग्य / अयोग्य	
४.	प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा मातृभोषेतील व्हर्नाक्युलर ७ वी, परिक्षा पास असलेले प्रमाणपत्र किंवा मान्यता प्राप्त प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेच्या प्राधिकाऱ्याने ७ वी ची परिक्षा झाल्याबद्दलचे शालांत परिक्षा प्रमाणपत्र / गुणपत्रक मुळ प्रत	योग्य / अयोग्य	
५.	तसेच अर्जासोबत जोडलेले शैक्षणिक व ईतर कागदपत्र मुळ प्रत १. २. ३. ४. ५.	योग्य / अयोग्य	
६.	छायाचित्र ओळख पुरावा (आधार कार्ड, पॅनकार्ड, वाहन परवाना, निवडणूक ओळखपत्र इ.)	योग्य / अयोग्य	
७.	उमेदवाराचे नजिकच्या कालावधीतील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (दोन प्रती)		

उमेदवाराची स्वाक्षरी **तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी**

(नाव) ------------------------------- **(नाव) ---------------------------------**

ग्राम पंचायत कार्यालय ___________ ता. __________ जि. __________

ग्राम पंचायत कर्मचारी भरती २०___

पात्र / अपात्र अर्जाची माहिती दि.___/____/२०___

अ.क्र.	उमेदवारांचे नाव	पात्र / अपात्र	प्राप्त गुण	अपात्रते बाबतची कारणे
१				
२				
३				
४				
५				
६				

ग्रामसेवक सरपंच

ग्राम पंचायत कार्यालय _____________

ता.__________ जि. __________

ग्राम पंचायत कार्यालय ____________ ता. __________ जि. __________

परिशिष्ट – ब (सभेचे इतिवृत्त नोंदवहीचा नमुना)

दिनांक – / /२० रोजी झालेल्या मासिकसभा बैठकीचे इतिवृत्त

<table>
<tr><td colspan="2">१)ग्रामपंचायतीचे नाव :-</td><td>२) सभेची वेळ :- सकाळी</td></tr>
<tr><td>३)सभेचा क्रमांक:-</td><td>४) सभेची तारीख :- / /२०</td><td>५)सभेचे स्थळ :- ग्रामपंचायत कार्यालय,</td></tr>
<tr><td colspan="3">६)सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्याची नोंद (हुद्द्यासह)
७)सभेचे अध्यक्ष मान्यवर:- श्री/ श्रीमती -- सरपंच / उपसरपंच यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेमधील उपस्थिती खालील प्रमाणे आहे.</td></tr>
</table>

अ.क्र.	सभेस उपस्थित कर्मचायाचे नाव	हुद्दा	भ्रमणध्वनी क्रमांक	ई-मेल आयडी	स्वाक्षरी
१					
२					

अ.क्र.	सभेस उपस्थित पंचायत सदस्याचे नाव	भ्रमनध्वनी व असल्यास ई-मेल आयडी	स्वाक्षरी
१			
२			
३			
४			
५			
६			
७			
८			
९			
१०			
११			

अ) वरीलप्रमाणे सभेस ---- (सदस्य) उपस्थित असल्याने व कोरम पूर्ण झाल्याने सभेचे अध्यक्ष --------------------- ------------------------------------ यांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेस सुरुवात करण्यात आली.

<table>
<tr><th>विषय क्रमांक</th><th>ठराव क्रमांक</th><th>सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय व ठराव</th><th>शेरे आणि दिनांकासह ठरावाची अंमलबजावणी</th></tr>
<tr><td>०</td><td>०</td><td>विषय :- ग्रामपंचायत सेवक/पाणीपुरवठा सेवक/ लिपीक निवड करणे बाबत.
नियोजित विषयसुचीनुसार सूचकांनी असा ठराव मांडला की, ग्राम पंचायत कर्मचारी भरती करण्यासाठी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार एकुण -------- उमेदवारांचे अर्ज ग्राम पंचायत कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार प्राप्त अर्जाची छाननी करण्यात आली व खालीलप्रमाणे अर्ज पात्र / अपात्र ठरले.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>उमेदवाराचे नाव</th><th>पात्र/ अपात्र</th><th>प्राप्त गुण</th></tr>
<tr><td>१</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>२</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>३</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>४</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>५</td><td></td><td></td><td></td></tr>
</table>
पात्र उमेदवारांपैकी सर्वाधिक गुण प्राप्त असलेल्या तीन उमेदवारांची नावे याप्रमाणे</td><td></td></tr>
</table>

		१. -- गुण -------- २. -- गुण -------- ३. -- गुण -------- यामधुन योग्यत्या उमेदवाराची ------------------------ या पदासाठी निवड करण्यात यावी. त्यावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली आणि चर्चेअंती श्री / श्रीमती / कु./ -- यांची --------------------- म्हणुन सर्वानुमते निवड करण्यात आली. सदरील ठराव हा सर्वानुमते संमत करण्यात आला. सूचक :- -- अनुमोदन :- ---	

वाचा :- १) महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम मधील कलम ६१

२) मुंबई ग्रामपंचायत नोकरांबाबत (सेवेच्या शर्ती) नियम, १९६०

३) शासन परिपत्रक क्र. व्हिपीएम २६८९/२२९७/२१, मंत्रालय, मुंबई दि. २९ डिसेंबर १९८९

जाक्र./ग्रापं___/कावि- / २०___

ग्रामपंचायत कार्यालय ____________

ता. _________ जि. _________

दि.___/___/ २०____

नेमणूक आदेश

प्रति,

श्री /श्रीमती / कु. ______________________________

मु. _________________

ता.______________ जि. ______________

आपली ग्राम पंचायत ---------------------------- येथे पंचायत सेवक/ पाणीपुरवठा सेवक/ लिपीक पदावर नेमणूक करण्यात येत आहे.

ग्राम पंचायत कर्मचारी म्हणून आपली नेमणूक खालील अटी व शर्तीच्या अधीन आहे; खालीलपैकी कोणत्याही अटी / शर्तीचे उल्लंघन झाल्यास ही नेमणूक रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीकडे आहेत.

<u>अटी व शर्ती</u>

१) संबंधित नियुक्त कर्मचारी यांनी हे आदेश निर्गमित झाल्याचे तारखेपासून १५ दिवसाचे आत कामावर रुजू व्हायचे आहे. विहित मुदतीत रुजू न झाल्यास आपली निवड रद्द करण्यात येईल.

२) सदरील कर्मचारी यांनी ग्रामपंचायत ----------------- ता. --------------- चे क्षेत्रात वास्तव्य करुन राहणे बंधनकारक आहे.

३) ग्रामपंचायतीने / सरपंच यांनी वेळोवेळी नेमुन दिलेली कामे करणे बंधनकारक आहे.

४) पंचायतीच्या पूर्व परवानगी शिवाय अन्यत्र कोणतीही नोकरी, काम, व्यवसाय करता येणार नाही.

५) कोणत्याही राजकीय चळवळीत, निवडणुकीत, निवडणूक प्रचारात भाग घेता येणार नाही.

६) कर्तव्यावर असतांना कोणत्याही प्रकारची गैरवर्तणूक केल्यास, नेमून दिलेली कामे करण्यात कसुर केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीकडे आहेत.

७) आपणस ग्रामपंचायत वेळोवेळी ठरवुन देईल त्याप्रमाणे वेतन व भत्ते अदा करण्यात येईल.

८) ही नेमणुक संबंधित जिल्हा पोलिस अधीक्षक यांचेकडून आपले चारित्र व पुर्वपडताळणीचा चांगला अहवाल प्राप्त होण्याच्या अटीवर करण्यात येते, अन्यथा आपली नेमणुक रद्द करण्यात येईल.

९) शारीरीक व मानसिक दृष्ट्या काम करणेस पात्र असल्याचे वैद्यकिय अधिकारी यांचे प्रमाणपत्र १५ दिवसांचे आत सादर करावे.

ग्रामसेवक सरपंच

ग्रामपंचायत ______________

ता. _________ जि. ________

प्रतिलिपी :-

१. मा. गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती, ______________ यांना माहितीस्तव.

ग्रामसेवक सरपंच

ग्रामपंचायत ______________

ता. _________ जि. ________

जाक्र./ग्रापं___/कावि-   / २०___
ग्रामपंचायत कार्यालय ____________
ता.___________ जि. _________
दि.___/___/ २०____

प्रति,

मा. जिल्हा शल्य चिकित्सक
जिल्हा रुग्णालय, _________

विषय :- वैद्यकिय तपासणी करून प्रमाणपत्र देणेबाबत.

संदर्भ :- ग्रा.पं.______________ कर्मचारी नेमणुक आदेश जा.क्र./ग्रापं__/कावि-___/२०__
दि.___/____/२०___

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती करण्यात येते की, संदर्भीय आदेशानुसार श्री/श्रीमती ______________ ________________ यांची ग्रामपंचायत कर्मचारी ________________ या पदावर ग्रामपंचायत ________________ ता.______________ येथे नियुक्ती झाल्यामुळे त्यांची वैद्यकिय तपासणी होणे आवश्यक आहे.

तेव्हा संबंधीताची वैद्यकिय तपासणी करून ते काम करण्यास शारीरिकदृष्ट्या सक्षम आहेत किंवा कसे ? याचे प्रमाणपत्र देण्यात यावे, ही विनंती.

ग्रामसेवक   सरपंच
ग्रामपंचायत _____________
ता. ________ जि. _______

याची एक प्रत श्री/श्रीमती ______________________________ग्रा.पं. कर्मचारी यांना देऊन सूचित करण्यात येते की, आपण जिल्हा रुग्णालय यांचे कडून वैद्यकिय तपासणी करून घेऊन प्रमाणपत्र सादर करावे.

ग्रामसेवक   सरपंच
ग्रामपंचायत _____________
ता. ________ जि. _______

जाक्र./ग्रापं___/कावि-   / २०___
ग्रामपंचायत कार्यालय ____________
ता.___________ जि. _________
दि.___/___/ २०____

प्रति,

मा. जिल्हा पोलिस अधिक्षक,
जिल्हा पोलिस मुख्यालय, _________

विषय :- ग्राम पंचायत कर्मचारी पदावर नियुक्त कर्मचाऱ्याचे चारित्र्य प्रमाणपत्र मिळणे बाबत.

संदर्भ :- ग्रा.पं.______________ कर्मचारी नेमणुक आदेश जा.क्र./ग्रापं__/कावि-___/२०__
दि.___/____/२०___

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती करण्यात येते की, संदर्भीय आदेशानुसार श्री/श्रीमती _______________ ________________ यांची ग्रामपंचायत कर्मचारी _________________ या पदावर ग्रामपंचायत ________________ ता.______________ येथे नियुक्ती झाल्यामुळे त्यांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक आहे.

तेव्हा त्यांचे चारित्र्या संबंधी संबधीचे प्रमाणपत्र प्रस्तुत कार्यालयास पाठविण्यात यावे. ही विनंती.

ग्रामसेवक   सरपंच
ग्रामपंचायत _____________
ता. ________ जि. _______

ग्रामपंचायत कार्यालय ____________
ता.___________ जि. _________
दि.___/___/ २०__

प्रति,

मा. गट विकास अधिकारी वर्ग-१
पंचायत समिती, _______________

विषय :- ग्रा.पं. कर्मचारी नियुक्त केल्याबाबत.
संदर्भ :- **१.** ग्रामपंचायत _____________ मासिक सभा ठराव क्र._____ दि. __/___/२०____
२. ग्रा.पं. ____________ कर्मचारी नेमणूक आदेश जा.क्र./ग्रापं_/कावि-___/२०__
दि.___/__/२०__

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणास विनंती करण्यात येते की, ग्रामपंचायत ___________ ता.________ येथे आकृती बंधानुसार _____________कर्मचारी पद मंजूर आहे. पुर्वीचे कर्मचारी सेवा निवृत्त झाल्यामुळे/ काढुन टाकल्यामुळे/मृत्यु झाल्यामुळे हे पद रिक्त आहे.

सदरील रिक्त पदावर नियमानुसार रितसर भरती प्रक्रिया राबवून नविन कर्मचाऱ्याची नियुक्ती केलेली आहे. या रिक्त पदावर श्री/श्रीमती ______________________________ यांची नेमणूक करण्यात आली आहे. तरी सदरील कर्मचाऱ्यांची नोंद घेऊन, पुढिल योग्य ती कार्यवाही व्हावी. ही नम्र विनंती.

सोबत :-

१. कर्मचारी निवडीचा मासिक सभेचा ठराव
२. कर्मचारी नेमणूक आदेश
३. कर्मचारी रुजू अहवाल

ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत _____________
ता. ________ जि. _______

परिशिष्ट — ब (सभेचे इतिवृत्त नोंदवहीचा नमुना)

दिनांक — / /२०__ रोजी झालेल्या मासिकसभा बैठकीचे इतिवृत्त

१)ग्रामपंचायतीचे नाव :-		२) सभेची वेळ :- सकाळी
३)सभेचा क्रमांक:-	४) सभेची तारीख :- / /२०	५)सभेचे स्थळ :- ग्रामपंचायत कार्यालय,

६)सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजार असल्यास त्याची नोंद (हुदद्यासह)

७)सभेचे अध्यक्ष मान्यवर:- श्री/ श्रीमती --- सरपंच / उपसरपंच यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेमधील उपस्थिती खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	सभेस उपस्थित कर्मचायाचे नाव	हुद्दा	भ्रमणध्वनी क्रमांक	ई-मेल आयडी	स्वाक्षरी
१					
२					

अ.क्र.	सभेस उपस्थित पंचायत सदस्याचे नाव	भ्रमनध्वनी व ई-मेल आयडी	स्वाक्षरी
१			
२			
३			
४			
५			
६			
७			
८			
९			
१०			
११			

अ) वरीलप्रमाणे सभेस --- (सदस्य) उपस्थित असल्याने व कोरम पूर्ण झाल्याने सभेचे अध्यक्ष ---------------------- ---------------------------------- यांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेस सुरुवात करण्यात आली.

विषय क्रमांक	ठराव क्रमांक	सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय व ठराव	शेरे आणि दिनांकासह ठरावाची अंमलबजावणी
०	०	**विषय :- ग्रामपंचायत कर्मचाऱ्याचे भविष्य निर्वाह निधीचे संयुक्त खाते उघडणे बाबत.** सूचकांनी असा ठराव मांडला की, ग्रामपंचायत कर्मचाऱ्याचे भविष्य निर्वाह निधीचे बँक खाते हे ग्रापं कर्मचारी व ग्रामसेवक यांचे संयुक्तपणे उघडणे व त्यात दरमहा वेतनातील शासनाने ठरवून दिलेला हिस्सा भरणे हे बंधनकारक केले आहे. आपल्या ग्राम पंचायतचे नवनियुक्त कर्मचारी श्री/श्रीमती_____ ____________________________ आणि सध्याचे ग्रामसेवक श्री ___________________________यांचे भ.नि.नि.बँक खाते संयुक्तपणे उघडण्यात यावे. सदरील ठरावावर सविस्तर चर्चा करून, सदरील ठराव हा सर्वांनुमते मंजूर करण्यात आला. सूचक : _______________________ अनूमोदक : _____________________	

ग्रामपंचायत कार्यालय ____________
ता.___________ जि. _________
दि.___/___/ २०____

प्रति,

मा.गट विकास अधिकारी वर्ग-१
पंचायत समिती, _________________

विषय :- ग्रा.पं. कर्मचाऱ्याचे भ.नि.नि. चे खाते उघडणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी सविनय विनंती करण्यात येते की, ग्रामपंचायत ____________________ येथिल नवनियुक्त ग्रामपंचायत कर्मचारी श्री/श्रीमती_____________________________ यांचे भविष्य निर्वाह निधीचे बँक खाते उघडणे आवश्यक आहे. सदरील खाते __________________________ बँकेत, हे खाते उघविण्यासाठी आपली परवानगी द्यावी. ही नम्र विनंती.

- **सोबत** : -
  १) कर्मचारी नेमणूक आदेश
  २) ग्रा.पं. ठराव सत्यप्रत.

ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत ____________
ता. _________ जि. _______